भूमीसंपदान, पुर्नवसन व पुर्न:स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम ५१ अन्वये औरंगाबाद येथे नव्याने स्थापन करावयाच्या भूमी संपादन, पुनर्वसन व पुर्न:स्थापना प्राधिकरणाकरिता एकून १३ पदे निर्माण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.आरपीए-१४१५/प्र.क्र.४५/र-१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : ९ सप्टेंबर , २०१९.

<u>वाचा</u> :- शासन निर्णय क्र.आरपीए-१४१५/प्र.क्र.४५/र-१, दिनांक २० डिसेंबर, २०१६.

<u>प्रस्तावना :-</u>

केंद्र शासनाने "भूमीसंपदान, पुर्नवसन व पुर्न:स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३॰ हा नवीन अधिनियम भूमीसंपदान व पुर्नवसन यासाठी एकत्रित पणे पारित केला आहे. सदर अधिनियम दि. ०१.०१.२०१४ पासून अंमलात आला असून या अधिनियमातील कलम ५१ नुसार भूसंपादन,मोबदला, पुनर्वसन आणि पुर्न:स्थापना यामधील वादांचे त्वरित निरसन (speedy disposal) होण्यासाठी शासन १ किंवा अधिक प्राधिकरणाची स्थापना करण्यासाठी अधिसुचना निर्गमित करु शकते, अशी तरतूद आहे. त्यानुसार वाचा येथील शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व महसूली विभागांसाठी एक भूमीसंपदान, पुर्नवसन व पुर्न:स्थापना प्राधिकरणाकरिता आवश्यक १३ पदांची निर्मिती करण्यात करण्यात आली आहे. तथापि, सदर प्राधिकरणाकडे प्राप्त होणा-या प्रकरणांची संख्या व त्यांचा निपटारा विहीत कालावधीत करण्याच्या अनुषंगाने औरंगाबाद येथे आणखी एक स्वतंत्र भूमीसंपदान, पुर्नवसन व पुर्न:स्थापना प्राधिकरणाची स्थापन करण्यात येत असून व सदर सदर प्राधिकरण, कार्यांविन्त करण्यासाठी आवश्यक कर्मचारी वर्गाची पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय :-</u>

"भूमीसंपदान, पुर्नवसन व पुर्न:स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३" मधील कलम ५१ च्या तरतूदीस अनुसरुन राज्यातील नाशिक, औरंगाबाद, पुणे व कोंकण या चार महसुली विभागांकरिता औरंगाबाद येथे नव्याने एक स्वतंत्र भूमीसंपदान, पुर्नवसन व पुर्न:स्थापना प्राधिकरणाची स्थापना करण्यास व स्थापन करावयाच्या या प्राधिकरणाकरिता परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार एकूण १३ पदे निर्माण करण्यास या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्याच्या नाशिक, औरंगाबाद, पुणे, कोंकण या चार महसुली विभागाकरिता औरंगाबाद येथे स्थापन करावयाच्या प्राधिकरणासाठी मंजूर करावयाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	प्राधिकरणासाठी नविन पद निर्मितीच्या पदांची एकुण संख्या	एकूण वित्तिय भार (रुपये)
१	पीठासीन अधिकारी (जिल्हा न्यायाधीश)	५१,५००-१२३०-५८९३०-१३८०-६३०७०	१	१३,५०,०००
२	निबंधक (तहसिलदार संवर्ग)	५६१००-१७५१००	१	८,४१,५००
३	कार्यकारी सहायक (अव्वल कारकून संवर्ग)	३६५००	२	८,७६,०००
४	कार्यकारी सहायक (लघूलेखक संवर्ग)	४८२५०	१	५,७९,०००
५	कार्यकारी सहायक (लिपीक-टंकलेखक संवर्ग)	२४,८७५	४	११,९४,०००
६	वाहन चालक	१५,०००	१	१,८०,०००
७	शिपाई	१२०००	३	४,३२,०००

अ) पीठासीन अधिकारी या पदावर जिल्हा न्यायाधीश संवर्गातील न्यायिक अधिका-याची नियुक्ती मा.मुंबई उच्च न्यायालय यांनी केलेल्या शिफारशीनुसार करण्यात येईल.

ब) प्राधिकरणाच्या निबंधक पदावर तहसिलदार संवर्गातील अधिकारी असेल व सदर पद हे प्रतिनियुक्तीव्दारे भरण्यात येईल.

क) अव्वल कारकून / लघूलेखक / लिपिक टंकलेखक हे वेगळे संवर्ग न ठेवता सदर सर्व पदांचा (एकूण ७ पदे) समावेश कार्यकारी सहायक (Executive Assistant) या संवर्गात करण्यात येत असुन सदर कार्यकारी सहायक संवर्गातील पदांवर अव्वल कारकून / लघूलेखक / लिपिक टंकलेखक याची नियुक्ती करण्यात येईल. कार्यकारी सहायक या संवर्गाचे सेवा प्रवेश नियम तयार करण्यात आल्यानंतर सदर सेवा प्रवेश नियमानुसार कार्यकारी सहायक संवर्गातील पदांसाठी पदभरती करण्यात येईल. सद्यस्थितीत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी प्राधिकरणासाठी आवश्यक असणारे अव्वल कारकून / लघूलेखक / लिपिक टंकलेखक ही पदे प्रतिनियुक्तीने भरावीत.

ड) वाहन चालक- १ व शिपाई- ३ अशी एकुण ४ पदे बाह्य यंत्रणेमार्फत घेण्याच्या अधिन राहून भरण्यात येतील.

ई) सदर प्राधिकरणाच्या कार्यलयासाठी आवश्यक ती जागा विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद येथे उपलब्ध करुन देण्यात यावी.

फ) नागपूर व औरंगाबाद येथील प्राधिकरणावर कार्यरत पीठासीन अधिकारी यांना वाहन अनुज्ञेय करण्यात येत आहे. त्यास अनुसरुन पीठासीन अधिकारी यांना जिल्हा न्यायाधिश संवर्गातील न्यायिक अधिका-यास अनुज्ञेय असलेले वाहन खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ग) यासाठी आवश्यक असणारा निधी मागणीचा प्रस्ताव संबंधित विभागीय आयुक्त यांनी शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०९०९१७२८३०३९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

Sandeep Prabhakar Kadam

Digitally signed by Sandeep Prabhakar Kadam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=de6d1d9fefa1eb37509fcc5fd07e0b3af4486320f7a793ab4ca8cbdf69c22cce, serialNumber=301b85c4e710923640c995342ca907a5457d5a2c3498260fb74e64b726578c6c, cn=Sandeep Prabhakar Kadam
Date: 2019.09.09 18:09:13 +05'30'

(संदिप.प्र.कदम)
कक्ष अधिकारी, महसुल व वन विभाग

प्रति,

१) मा.राज्यपाल महोदयांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
५) सर्व सन्माननीय विधान परिषद / विधानसभा सदस्य व संसद सदस्य
६) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई,
७) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
८) महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
९) महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर,
१०) सर्व विभागीय आयुक्त,
११) सर्व जिल्हाधिकारी,
१२) सर्व जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
१३) सर्व कार्यासने (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४) निवड नस्ती, कार्यासन र-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय. मुंबई.